# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः17.05.2024** **वारःशुक्रवार**

---

1)लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील प्रचाराला वेग,

2)पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज मुंबईत जाहीर सभा; तर उत्तर प्रदेशात राहुल गांधी यांच्यासह विविध पक्षांच्या मातब्बर नेत्यांच्या सभा

3) सातव्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज अखेरचा दिवस

४)घाटकोपरमधील जाहिरातफलक दुर्घटनेतील मुख्य आरोपी भावेश भिंडे याला उदयपूरमध्ये अटक आणि

५)पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतीय टेबल टेनिस संघाचे नेतृत्व मनिका बत्रा आणि शरथ कमल करणार

**निवडणूक**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातल्या प्रचाराला आता वेग आला आहे. या टप्प्यात मुंबईत येत्या सोमवारी मतदान होणार आहे. उद्या प्रचाराचा अंतिम दिवस असल्याने सर्वच पक्षांच्या नेत्यांच्या सभा, प्रचारफेऱ्यामुळे वातावरण ढवळून निघालं आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबईत शिवाजीपार्क इथं प्रचार सभा घेणार आहेत. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्यासह मनसे नेते राज ठाकरे यात सहभागी होणार आहेत.

**इंडियाआघाडी**

विरोधकांच्या इंडिया आघाडीनंही मुंबईतल्या बांद्रा कुर्ला संकुल इथं आज प्रचारसभेचं आयोजन केलं आहे. या सभेला कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविन्द केजरिवाल, ज्येष्ठ नेते शरद पवार, उद्धव ठाकरे आणि इंडिया आघाडीचे इतर नेते या सभेला संबोधित करण्याची अपेक्षा आहे.

दरम्यान विविध राजकीय पक्षांचे मातब्बर नेते आज उत्तर प्रदेशात येणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सलग दुसऱ्या दिवशी उत्तर प्रदेशात प्रचार करणार असून, ते बाराबंकी, फतेहपूर आणि हमीरपूर मतदारसंघात जाहीर सभांना संबोधित करणार आहेत.

तसंच आज रायबरेलीमध्ये संपूर्ण गांधी परिवार हजर राहणार आहे. सोनिया गांधी, राहुल गांधी प्रियांका गांधी आणि समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव एकत्रितपणे एका सभेला संबोधित करतील. अमेठीत स्मृती इराणी यांच्या विरोधात निवडणूक लढवणाऱ्या कॉँग्रेस उमेदवार किशोरीलाल शर्मा यांच्या प्रचारासाठी अखिलेश यादव आणि राहुल गांधी एकत्रितपणे एका सभेला संबोधित करणार आहेत.

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ बलरामपूर, बाराबंकी, लखनौ आणि अयोध्या इथं प्रचार करणार आहेत, तर मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव पोटनिवडणूक होणाऱ्या गैनसाडी विधानसभा मतदारसंघात प्रचार करणार आहेत. ए आय एम आय एम चे प्रमुख असदुद्दीन ओवेसी अपना दलच्या अध्यक्षा पल्लवी पटेल यांच्यासह कौशांबी जिल्ह्यातील कमरवाडी इथं एका सभेला संबोधित करणार आहेत.

दरम्यान, देशभरात आतापर्यंत चार टप्प्यांत एकूण 378 जागांसाठी मतदान झाले असून, पहिल्या टप्प्यात ६६.९५ टक्के मतदान झालं आहे.

<u>पंजाब-केजरीवाल</u>

आम आदमी पार्टीचे राष्ट्रीय संयोजक आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी काल संध्याकाळी अमृतसरमधून पक्षाच्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराला सुरुवात केली. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत सिंग मान यांच्यासमवेत त्यांनी अमृतसर शहरात प्रचारफेरी काढली आणि लोकांना आम आदमी पार्टीला राज्यातील सर्व 13 जागा जिंकून देण्याचं आवाहन केलं. तुरुंगातून बाहेर आल्यानंतर लगेच पंजाबला आल्याचं सांगत, मुख्यमंत्री भगवंत सिंग मान यांच्या तुरुंगातील भेटींमध्ये पंजाब आणि तिथल्या लोकांबद्दल सर्वाधिक चौकशी करत असे, असं केजरीवाल म्हणाले. प्रचारफेरीपूर्वी दोन्ही नेत्यांनी सुवर्ण मंदिर आणि दुर्गियाना मंदिरात जाऊन पूजा केली आणि पंजाबच्या शांतता आणि समृद्धीसाठी प्रार्थना केली.

<u>सातवा-टप्पा</u>

लोकसभा निवडणूकीच्या सातव्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज अखेरचा दिवस आहे. या टप्प्यात ७ राज्य आणि एका केंद्रशासित प्रदेशातील ५७ लोकसभा मतदारसंघात १ जून रोजी मतदान होणार आहे. उत्तर प्रदेश आणि पंजाबधील प्रत्येकी १३, पश्चिम बंगालमधील ९, बिहारमधील ८, ओडीशातील ६, हिमाचलातील ४, झारखंडमधील ३, केंद्रशासित प्रदेश चंदिगढमधील एका जागेसाठी लढत होणार आहे. सर्व मतदारसंघातील मतांची मोजणी ४ जून रोजी होणार आहे.

<u>मोदी-मुलाखत</u>

भारतीय निवडणूक आयोग हा जगासाठी एक चमत्कार आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत एका खासगी वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत केलं. आयोगाचे उल्लेखनीय कार्य जगासमोर आणणे ही त्यांच्या सरकारची जबाबदारी आहे, असंही त्यांनी सांगितलं. लोकशाहीमध्ये निवडणुकांचे विभाजन केवळ हरणे किंवा जिंकणे म्हणून केले जाऊ नये. निवडणुकांमुळे पक्षाचा संदेश थेट लोकांपर्यंत पोहोचवण्याची संधी मिळते, असंही पंतप्रधान म्हणाले. यावेळी त्यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली. कॉग्रेस पक्षासाठी लोकशाही म्हणजे सत्तेत राहणे आहे. या पक्षाच्या सदस्यांवर गांधी घराण्याच्या वारशाचा दबाव आहे, असा आरोपही पंतप्रधानांनी केला.

<u>घाटकोपर</u>

घाटकोपरमधील जाहिरातफलक कोसळून झालेल्या दुर्घटनेतील मुख्य आरोपी भावेश भिंडे याला काल राजस्थानमधील उदयपूर इथून मुंबई पोलीसांनी अटक केली. तो इगो मिडीया प्रायव्हेट लिमिटेड नावाच्या कंपनीचा मालक आहे. कंपनीद्वारे अनधिकृतरित्या उभारलेला अजस्त्र जाहिरातफलक  सोमवारी अचानक आलेल्या वादळाने कोसळून १६ जणांचा मृत्यू झाला आणि ७५ जण जखमी झाले होते.

स्वाती-मालीवाल

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या स्वीय सहाय्यकाने केलेल्या गैरवर्तनाविरोधात आम आदमी पक्षाच्या राज्यसभा खासदार स्वाती मालीवाल यांनी दिल्ली पोलीसांत तक्रार दाखल केली आहे. दिल्ली पोलीसांनी प्राथमिक माहिती अहवाल दाखल केला आहे. गेल्या १३ तारखेला मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी विभव कुमार यांनी मालीवाल यांच्याशी गैरवर्तन केल्याचा आरोप आहे. दरम्यान, या घटनेचं भाजपानं राजकारण करु नये अशी विनंती मालीवाल यांनी केली आहे.

पदवीपूर्व प्रवेशपरिक्षा

येत्या शैक्षणिक वर्षातील प्रवेशासाठी आवश्यक असलेली पदवीपूर्व प्रवेशपरिक्षा सी यू ई टी (CUET (UG) गेल्या दोन दिवसांपासून देशभरातल्या तसंच परदेशातील २६ शहरांमध्ये २ हजार १७७ परीक्षा केंद्रांवर घेण्यात येत आहे. देशातील १ हजार ५७८ परीक्षा केंद्रांवर काल ही परीक्षा पार पडली.  अर्थशास्त्र, हिंदी, भौतिकशास्त्र आणि गणित आणि उपयोजित गणित या विषयांसाठी एकंदर १५ लाख ८१ हजार विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली.

तटरक्षक दल

भारतीय तटरक्षक दलानं भारतीय समुद्रात शिरून बेकायदा मासेमारी करणाऱ्या श्रीलंकेच्या पाच बोटी पकडल्या आहेत. तटरक्षक दलाचे राणी दुर्गावती जहाज पाल्क सामुद्रधुनीजवळ गस्तीवर असताना, तामिळनाडू किनारपट्टीवरील पॉइंट कॅलिमेरपासून सुमारे १५ मैलांवर या संशयास्पद बोटी दिसल्या. या सर्व पाच बोटी मासेमारी उपकरणांनी सुसज्ज आहेत. तटरक्षक दलानं कायद्याचं उल्लंघन केल्याबद्दल १४ श्रीलंकन नागरिकांसह या पाच बोटी ताब्यात घेतल्या आहेत. पुढील कायदेशीर कारवाईसाठी या बोटी आणि त्यावरील १५ लोकांना नागापट्टिनम इथल्या कोस्टल सिक्युरिटी ग्रुपकडे सुपूर्द करण्यात येणार आहे.

एलोर्डा चषक

कझाकस्तानच्या अस्ताना इथं सुरू असलेल्या एलोर्डा चषक मुष्टीयुद्ध स्पर्धेत महिलांच्या ५२ किलो वजनी गटात विद्यमान विश्वविजेत्या निखत झरीननं  कझाकस्तानच्या तोमिरिस मिर्झाकुलवर पाच - शून्य असा शानदार विजय नोंदवत, अंतिम फेरीत प्रवेश केला. निखतसोबतच ४८ किलो गटात मीनाक्षी, ५० किलो गटात अनामिका आणि ६० किलो गटात मनीषा यांनीही अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. मीनाक्षीनं गुलनाझ बुरीबायेवा विरुद्ध विजय मिळवला तर मनीषाने तंगतार एसेमचा पराभव केला. उद्या अंतिम फेरीतील सामने होणार आहेत.

सुनील छेत्री

भारतीय फूटबॉलपटू सुनील छेत्री यानं आपली निवृत्ती काल समाजमाध्यमाद्वारे जाहीर केली. कोलकत्यात ६ जून रोजी कुवेतशी होणारा सामना त्याचा शेवटचा सामना असणार आहे. सुनील छेत्रीनं २००५मध्ये पाकिस्तानबरोबरच्या सामन्यातून आंतरराष्ट्रीय फूटबॉलमध्ये पदार्पण केलं होतं. दीडशे आंतराराष्ट्रीय सामन्यांत ९४ गोल करण्याची कामगिरी त्याच्या नावावर आहे. क्रिस्तियानो रोनाल्डो आणि लिओनल मेस्सीनंतर जगातला सर्वाधिक गोल करणारा फूटबॉलपटू म्हणून सुनील छेत्रीची ओळख आहे.

**<u>ऑलिम्पिक</u>**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये सहभागी होणाऱ्या सहा सदस्यीय भारतीय टेबल टेनिस संघाचे नेतृत्व अव्वल टेबल टेनिसपटू मनिका बत्रा आणि अनुभवी शरथ कमल करणार आहेत. भारतीय टेबल टेनिस महासंघानं काल या संघाची घोषणा केली.

**<u>बॅडमिंटन</u>**

बँकॉक इथं सुरू असलेल्या थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या दुहेरी सामन्यात भारताच्या सात्विक साईराज रेड्डी आणि चिराग शेट्टी यांच्या जोडीनं उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे, तर पुरुष एकेरीत भारताच्या मेईराब लुवांग मैसनामनं  उपउपांत्य फेरी गाठली आहे.

**<u>हवामान</u>**

दक्षिण भारतात येत्या २२ तारखेपर्यंत अतिवृष्टीचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. तामिळनाडू, पुदुचेरी, कराईकल, कर्नाटक, केरळच्या काही भागांत पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मान्सून येत्या तीन दिवसांत दक्षिण अंदमान, बंगालच्या उपसागरातील अग्नेय भागात आणि निकोबार बेटांवर सरकण्याची शक्यता आहे. दरम्यान, देशाच्या वायव्य, मध्य आणि पूर्व भारतातील अनेक भागांमध्ये पुढील तीन ते चार दिवस कमाल तापमानात दोन ते चार अंश सेल्सिअसने  वाढ होण्याची शक्यता असून, नवी दिल्लीतील तापमान आज ४३ अंश सेल्सिअसपर्यंत जाईल अशी शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.